Exh 27/D

रे.क.नं. ६१/२०२१

# मे. सिव्हील जज्जसो, ज्युनियर डिव्हीजन, कळे–खेरीवडे

## यांचे कोर्टात . . .

**श्री जयसिंग आप्पा मेंगाणे** ———— **वादी**

**वगैरे....**

**विरुध्द**

**श्री. बाळु तुकाराम पाटील (आतकिरे)** ———— **प्रतिवादी**

**वगैरे....**

**यातील प्रतिवादी नं. १ तर्फे विनंती अर्ज की,**

१) सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरूध्द हक्कज्ञापन व कायम मनाई करीता मे. कोर्टात दाखल केला आहे. सदरकामी प्रस्तुत प्रतिवादी वकींलामार्फत मे. कोर्टात हजर झालेले आहेत.

O.S to Say
Neha
13/7/22

२) सदर कामी प्रतिवादी हे हजर झाले नंतर प्रस्तुत प्रतिवादी हे वयोवृध्द असुन अशिक्षीत अडाणी इसम आहेत त्यांना सदर दावेतील कामकाजाची कागदपत्रे संबधीत कार्यालयाकडुन उपलब्ध होणेस विलंब झाला असुन सदर कागदपत्रे प्रतिवादी यांना म्हणणे व कैफियत देणेसाठी अत्यंत जुने असलेने लवकर प्राप्त न झालेने सदर कामी कैफियत व म्हणणे दाखल करणेस विलंब

Superintendent
Civil Court Sr Dn. Kolhapur

झालेला आहे. सदरकामी कैफियत नाही (नो डब्ल्यु एस) आदेश झालेला नाही परंतु सदर प्रतिवादी यांना कैफियत व म्हणणे दाखल करणेस कायद्यातील तरतुदीनुसार विलंब झालेला असलेने वर नमुद कारणास्तव सदरचा अर्ज प्रस्तुत प्रतिवादींनी दिलेला आहे.

३) सदर प्रतिवादी यांनी सदर कामी कैफियत देणेस मुद्दाम अगर हेतूपुरस्सरपणे विलंब केलेला नाही. सदर प्रतिवादी हे वर नमुद कारणास्तव अशिक्षीत व अडाणी इसम असलेने व कागदपत्रांची पूर्तता न करू शकलेने मे. कोर्टात येवून कैफियत व म्हणणे देणे अडचणीचे झाले असलेने प्रस्तुत कामी वेळेत कैफियत दाखल करता आलेली नाही व सदर म्हणणे व कैफियत दाखल करणेस विलंब झालेला आहे.

Perused the application & say filed. Even though the delay is not justified nonetheless opportunity to defend needs to be given based on natural justice principle. for the delay Def. is saddled with cost of Rs. 350/-

Nehu
1/8/22

४) सदरचा अर्ज मंजूर करणेत येवून प्रस्तुत अर्जासोबतची कैफियत व म्हणणे सदर दाव्यामध्ये सामील करुन घेतलेस वादींचे कांहीही नुकसान होणार नाही व सदर दाव्याचे निराकरण गुणदोषांवर होणेस मदतच होणार आहे. मात्र तसे न झालेस प्रतिवादींचे कधीही, कशानेही न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे व मल्टीप्लीसिटी ऑफ प्रोसिडींग्ज होणार आहे.

५) **<u>सबब, प्रस्तुत प्रतिवादी नं. १ यांची मे.कोर्टास नम्र विनंती की,</u>**

अ) सदरचा अर्ज मंजूर करणेत येवून सदर कामी प्रतिवादी नं. १ यांना कैफियत व म्हणणे दाखल करणेस झालेला विलंब माफ करणेत येवुन सदर अर्जासोबतची कैफियत व म्हणणे रेकॉर्डवर घेणेत यावी.

Superintendent
Civil Court Sr Dn. Kolhapur

ब) जरुर तर अर्ज दुरुस्तीस परवानगी असावी.

———— येणेप्रमाणे अर्ज असे.

**कोल्हापूर** **मे.जा.व्हावे,**

**दिनांक — १३/०७/२०२२**

## प्रतिज्ञा

मी प्रतिवादी नं. १ श्री बाळू तुकाराम पाटील (आतकिरे) व.व. ८० धंदा — शेती, रा. आतकिरवाडी ता. पन्हाळा जि.कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की वरील अर्जातील संपूर्ण मजकूर आमचे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मुक्काम कोल्हापूर तारीख— १३/०७/२०२२.

## ॲफिडेव्हीट

मी प्रतिवादी नं. १ श्री बाळू तुकाराम पाटील (आतकिरे) व.व. ८० धंदा — शेती, रा. आतकिरवाडी ता. पन्हाळा जि.कोल्हापूर, शपथपूर्वक कथन करतो की, वरील अर्जामधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मुक्काम कोल्हापूर, तारीख— १३/०७/२०२२.

**ॲफिडेव्हीट करणार यांना**

**मी ओळखतो**

**ॲडव्होकेट**

(Adv. S. R. Patil)

## प्रतिज्ञा

मी प्रतिवादी नं. १ श्री बाळू तुकाराम पाटील (आतकिरे) व.व. ८० धंदा – शेती, रा. आतकिरवाडी ता. पन्हाळा जि.कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की वरील अर्जातील व त्याखालील ॲफिडेव्हीटमधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मुक्काम कोल्हापूर ,तारीख– १३/०७/२०२२.

सही: डा.हा. अंगठा बाळू तुकाराम पाटील यांचा सही Neeli

Balu Tukaram Patil (Atkire) Age 80 yrs r/ Atkirewadi who open (?) Identified by Sh. B. R. Patil Adv. whom I know personally
Dated - 13/7/22
Superintendent
Civil Court Sr Dn.Kolhapur

Say - Delay to file WS in birla (?) had stage is not just and sufficient. However if W.S is to be accepted cost of Rs. 1000/- be awarded

V. B. Mane (?)
Adv.
1-8-2022